सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्रीमती वर्षा वि. पाळंदे, लेखा अधिकारी.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन आदेशः-संलेको-२०२५/प्र.क्र.८७/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १७.०७.२०२५.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
18 JUL 2025
प्राप्त झाले सही...

संदर्भ:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/ श्रीम. पाळंदे/०३.२५/२२४/०१९२/९९३, दि.०४.०३.२०२५

२) संचालक तथा प्रकल्प व्यवस्थापक, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.आव्यप-२०१९/प्र.क्र.१४१/आव्यप्र-१, दि.३१.०७.२०२४,

३) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्रीमती पाळंदे/ प्रतिक्षाधीन/०८-२०२४/५४७, दि.२३.०८.२०२४,

४) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.१३६/कोषा प्रशा-२, दि.३०.०९.२०२४,

५) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्रीमती पाळंदे/ प्रतिक्षाधीन/१०-२०२४/६३३, दि.०९.१०.२०२४,

६) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्रीमती पाळंदे/ रुजू व पदस्थापना/१०-२०२४/६४०/१५१, दि.१४.१०.२०२४,

७) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/प्रशा-राप/का-६/रजा/०२.२५/ २१८, दि.०३.०३.२०२५.

-: **शासन आदेश** :-

122

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गातील श्रीमती वर्षा विनायक पाळंदे यांना शासन वित्त विभाग आदेश दि.१८.०५.२०२२ अन्वये पदोन्नतीने लेखाधिकारी, राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प, मुंबई शहर या पदावर पदस्थापना देण्यात आली होती. राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प-२ संपुष्टात आल्याने श्रीमती पाळंदे यांच्या सेवा शासनाकडे प्रत्यावर्तित करुन त्यांना संदर्भ क्र.२, दि.३१.०७.२०२४ अन्वये दि.३१.०७.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्रीमती पाळंदे ह्या संदर्भ क्र.३ अन्वये दि.०१.०८.२०२४ (म.पू.) रोजी संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे प्रतिक्षाधीन लेखा अधिकारी म्हणून रुजू झाल्या.

४. संदर्भ क्र.४, शासन आदेश दि.३०.०९.२०२४ अन्वये श्रीमती पाळंदे यांची लेखा अधिकारी, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या पदावर पदस्थापना करण्यात आली.

५. त्याअनुषंगाने संचालनालयाने श्रीमती पाळंदे यांना संदर्भ क्र.५ अन्वये दि.०१.१०.२०२४ (म.पु.) रोजी प्रतिक्षाधीन लेखा अधिकारी पदावरुन कार्यमुक्त केले असून संदर्भ क्र.६, दि.१४.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये लेखा व कोषागारे संचालनालयाच्या आस्थापनेवर दि.०१.१०.२०२४ (म.पू.) पासून नियमित लेखा अधिकारी म्हणून रुजू करुन घेण्यात आले.

D:\gaurav dande\सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी\२०२५\श्रीमती पाळंदे.docx

00924/2025/1323
22-7-2025
24.07.25

६. श्रीमती पाळंदे यांनी दि.०९.०९.२०२४ ते दि.१३.०९.२०२४ या कालावधीत ०५ दिवस अर्जित रजा उपभोगलेली असून सदर रजा संचालनालयाच्या संदर्भ क्र.७ दि.०३.०३.२०२५ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आली आहे.

७. श्रीमती पाळंदे, लेखा अधिकारी यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.०१.०८.२०२४ ते दि.०८.०९.२०२४ | ३९ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे कार्यरत. |
| २. | दि.०९.०९.२०२४ ते दि.१३.०९.२०२४ | ०५ दिवस | अर्जित रजा. संचालनालयाच्या दि.०३.०३.२०२५ च्या आदेशान्वये मंजूर. |
| ३. | दि.१४.०९.२०२४ ते दि.३०.०९.२०२४ | १७ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे कार्यरत. |
| | एकुण | ६१ दिवस | |

८. यास्तव, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण सेवाशर्ती) नियम, १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदींच्या अधीन राहून लेखा अधिकारी संवर्गातील श्रीमती वर्षा विनायक पाळंदे यांच्या दि.०१.०८.२०२४ ते दि.३०.०९.२०२४ पर्यंत ६१ दिवस नियमित करावयाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे (रजा कालावधीसह) वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता लेखा अधिकारी (र व का.), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता.र.पवार)
**अवर सचिव, वित्त विभाग.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) लेखा अधिकारी (र व का),संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई ,*
६) श्रीमती वर्षा विनायक पाळंदे, लेखा अधिकारी,*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)